पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे ४११ ००८
दूरध्वनी क्रमांक ०२०- २५६५७८७८ फॅक्स क्र. ०२०-२५६७४६४१
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in
(आस्थापना शाखा)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.आस्था-१/पोना ते पोहवा पदोन्नती/आदेश-०२/२०२२/ 15473 पुणे, दिनांक- २५/१२/२०२२. 01/12

संदर्भ :- १. शासन निर्णय, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१
२. सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २२.०६.२०२१ ची अधिसूचना
३. जिल्हा पोलीस आस्थापना मंडळ यांचे दिनांक २४.११.२०२२ चे बैठकीचे इतीवृत्त
४. निवडसूची दिनांक २४.११.२०२२

विषय :- पदोन्नती बाबत . . . .
पोलीस नाईक पदावरुन पोलीस हवालदार पदावर पदोन्नती.

*****

आ दे श

खालील नमूद पोलीस नाईक हे पदोन्नतीसाठी असलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्याने, त्यांना सेवाज्येष्ठतेनुसार पोलीस नाईक पदावरुन पोलीस हवालदार पदावर प्रत्यक्ष हजर होतील त्या दिनांकापासून खालील विहीत केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यांत येत आहे. पोलीस हवालदार पदी पदोन्नती देण्यात आलेल्या खालील नमूद पोलीस अंमलदार यांना पदोन्नती स्विकारले दिनांका पासून रु.५००/- इतके विशेष वेतन मंजूर करण्यात येत आहे.

**वेतनश्रेणी**

| वेतनश्रेणी | पद | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| पदोन्नती पूर्वीचे | पोलीस नाईक | ७ व्या वेतन आयोगातील पे मॅट्रिक्स नुसार **(एस-८ मध्ये रू.२५,५००/- ते ८१,१००/-)** |
| पदोन्नती नंतरचे पद | पोलीस हवालदार | ७ व्या वेतन आयोगातील पे मॅट्रिक्स नुसार **(एस-९ मध्ये रू.२६,४००/- ते ८३,६००/-)** |

**भाग - १**

| अ.क्र. | सेवा जेष्ठता क्रमांक | पदनाम | ब.क्रं. | पोलीस अंमलदारांचे नाव | पोलीस स्टेशन |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 7 | पोना | 1270 | संजय किसन मल्हारे अजिब | इंदापूर |

**अटी व शर्ती :-**

१. वर नमूद पोलीस अंमलदार यांना शासन निर्णय, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१ तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणाऱ्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून पदोन्नती कोटयातील सर्व रिक्त पदे सेवाज्येष्ठतेने भरण्यात येत आहेत.

२. सदर आदेशान्वये पदोन्नती दिलेल्या पोलीस अंमलदारांच्या विरुध्द प्राथमिक / विभागीय चौकशी, गुन्हा अथवा न्यायालयीन प्रकरण सुरु अथवा प्रलंबित असल्यास किंवा ते सद्य:स्थितीत निलंबनात असल्यास अथवा मूळ वेतनावर ठेवण्याची अथवा वेतनवाढ स्थगितीची शिक्षा भोगत असल्यांस त्यांना पदोन्नती वर कार्यमुक्त करु नये तसेच पदोन्नतीवरील

CamScanner

पदावर हजर करुन न घेता, संबंधित प्रभारी अधिकारी यांनी सदर अंमलदार यांची माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी. त्याअनुषंगाने त्यांचे पदोन्नती बाबत पुन्हा निर्णय घेवून स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पीएआय-१०८२/सीआर-११००(१)एसईआर-३,दिनांक ०६/११/१९८४ प्रमाणे पदोन्नती झाल्यावर कनिष्ठ पदातील वेतनवाढी नंतर पदोन्नतीच्या पदातील वेतन निश्चितीसाठी विकल्प द्यावयाचा असेल, अशा अंमलदार यांनी एक महिन्याच्या आंत विकल्प या कार्यालयास सादर करावा. त्यानुसार त्यांची वेतननिश्चिती करण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना लिपीकाची राहील. याबाबत प्रभारी अधिकारी यांनी सदरची बाब प्रत्येक अंमलदार यांच्या निदर्शनास आणून द्यावी व मुदतीत पदोन्नती स्विकारलेला दिनांक नमूद करून त्यांचे अर्ज विकल्पासह या कार्यालयास सादर करावेत.

४. पदोन्नती दिलेल्या अंमलदारांपैकी ज्या अंमलदार यांना सदरची पदोन्नती स्विकारण्याची इच्छा नाही. अशा अंमलदार यांचे लेखी अर्ज सात दिवसांत या कार्यालयांस सादर करण्याची संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी. तसेच पदोन्नती कार्यभार स्विकृत केल्याच्या दिनांकासह अहवाल संबंधित प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास सात दिवसांत सादर करावा.

५. वर नमूद पदोन्नती दिलेल्या पोलीस अंमलदारांपैकी जे अंमलदार रजेवर /गैरहजर/ सिकमध्ये असतील, व ते पदोन्ती आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्यानंतर पदोन्नती पदावर हजर झाल्यास त्यांना पदोन्नतीचा परिणाम ते प्रत्यक्ष पदोन्नती वरिल पदावर हजर होतील, त्या दिनांकापासुन देय राहील. व त्यांची सेवाजेष्ठता त्या दिनांकापासून ग्राह्य धरण्यात येईल.

६. वर नमूद पदोन्नती दिलेल्या अंमलदारांपैकी जे पोलीस अंमलदार सद्य:स्थितीत इतर घटकांत प्रतिनियुक्तीवर आहेत, अशा अंमलदारांच्या संबंधित प्रतिनियुक्तीच्या घटकांने त्यांच्याकडे मंजूर संख्याबळानुसार सामावून घेतल्यानंतरच त्यांना पदोन्नतीचा परिणाम देय राहील. संबंधीत अंमलदार ते पदोन्नती स्विकारण्यास ईच्छुक आहे किंवा नाही याबाबत त्यांच्याकडून लेखी निवेदन घेवून त्यांना पदोन्नतीवर हजर करून घेतलेबाबतचे रिपोर्टसह पदोन्नती आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्यांचा आत या कार्यालयास सादर करावे. तसेच संबंधित प्रतिनियुक्तीच्या घटकाने संबंधीत पदोन्नती दिलेल्या अंमलदारास सामावून घेतले नाही, तर सदर अंमलदारांस या घटकात पदोन्नतीवर हजर होणासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.

७. वर नमूद केलेल्या पदोन्नती आदेशातील एखाद्या अंमलदारांनी पदोन्नती नाकारल्यास त्याचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र. ३०३/का.१२, दिनांक १२/०९/२०१६ मधील तरतुदीनुसार चालु वर्षाच्या पदोन्नती निवडसूचीवरुन कमी करण्यात येईल. व त्यापुढील दोन वर्षाच्या निवडसूची मध्ये त्यांचे नाव समावेश करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच त्यांना कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही

८. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शानिक्र. वशिअ-१२१४/प्र.क्र. ५१ (२)/११, दिनांक १७/११/२०१४ रोजीचे परिपत्रकात नमूद केलेप्रमाणे पदोन्नती दिलेल्या पोलीस अंमलदार यांचे मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र भरुन घेण्यात येऊन, धित प्रभारी अधिकारी यांनी कार्यालयास सादर करावेत. **पदोन्ती झालेल्या पोलीस अंमलदार यांचे मत्ता व दायित्व संबंधित आस्थापना लिपीकाकडे प्राप्त झाल्या शिवाय पदोन्नती पदावरील वेतननिश्चिती करण्यात येणार नाही असा पदोन्नती समितीच्या निर्णय घेतला आहे.**

सदरचे पदोन्नतीचे आदेश पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आले आहेत. तसेच संबंधित पो.स्टे./शाखेच्या डी.ओ.यांनी सदरचे आदेश सलग ०३ दिवस हजेरीवर वाचून दाखवावे.

**पदोन्नती झालेल्या सर्व पोलीस अंमलदार यांचे मा. पोलीस अधीक्षक यांनी अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीकरीता त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.**

**( अंकित गोयल )** भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.



CamScanner